# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 259/2023 दिनांक : 04.07.2023

## 1)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 03.07.2023 रोजी चे 00.25 वा. चे सुमारास, **अदिती हॉटेल समोर लातुर फाटा ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मित्राला भेटुन लातुर फाटा येथुन पाई विष्णुपूरीकडे जाताना अदिती हॉटेल समोर आला असतांना अचानक फिर्यादीचे पाठी मागुन काळया व सिल्वर रंगाची एक हिरो होंडा स्पलेंडर प्लस मो सा क्रमांक एमएच–26/बीजे–0950 वर बसुन यातील नमुद तीन आरोपी फिर्यादीचे समोर जावुन व पुन्हा गाडी वळुन फिर्यादीचे जवळ येवुन फिर्यादीचे मोबाईलवर एक फोन लावुन देण्याचा बहाना करून त्यापैकी श्रेयश याने फिर्यादीचे हातातील विवो एस–.1 कंपणीचा मोबाईल किंमती 17,500/–रूपयाचा घेतला व महेश याने खंजरने फिर्यादीस दोन्ही हाताच्या पोटरीवर मारून जखमी केले आहे. व दुर्गेश पळुन गेला आहे. दोन्ह आरोपी अटक असुन गुन्हयातील मोबाईल मिळाला आहे. वगैरे **फिर्यादी वैभव ज्ञानेश्वर नागरे, वय 29 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. औंढा नागनाथ ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 485/2023 कलम 394, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री थोरात, मो.क्र. 9823298315** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 02.07.2023 रोजी चे 23.30 ते दिनांक 03.07.2023 चे 11.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी नवी आबादी इंदिरानगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे पाठीमागील दरवाजा जोराने ढकलुन दरवाजाची आतील कोंडी तोडुन आत प्रवेश करून कुलूप नसलेले लोखंडी कपाट उघडुन फिर्यादीचे बचत गटाचे ठेवलेले नगदी 30,000/–रूपये व सोन्याची एक चैन 12 ग्राम वजनाची किंमी 35,000/–रूपयाची जुनी वापरती असा एकुण 65,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेले. वगैरे **फिर्यादी चंद्रकला राजु घुले, वय 27 वर्षे, व्यवसाय फायनान्स व घरकाम रा. नवी आबादी इंदिरानगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 221/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1839 कांबळे, मो.क्रं. 9823342366** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)बिलोली :–** मार्च 2018 ते आज पावेतो, **धनगर गल्ली कंठेश्वर निजामाबाद राज्य तेलंगणा ह. मु. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस लहान सहान कारणावरून माणीसक त्रास देवुन, उपाशी पोटी ठेवुन मो सा घेण्यासाठी 1,00,000/–रूपये घेवुन ये असे म्हणुन घराबाहेर हाकलुन दिले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 103/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2049 आंबेवार, मो.क्रं. 9850102611** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 15.12.2021 ते दि. 03.07.2023 चे 18.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी सावित्रीनगर भवसार चौक नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन ए सी, सोफा, सोन्याची साखळी अंगठी घेवुन ये नाहीतर तुला नांदवणार नाही. म्हणुन सासरी शिवीगाळ करून मारहाण केली व उपाशीपोटी ठेवुन माणसीक त्रास देवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 223/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2268 धुळगुंडे, मो.क्रं. 9834158895** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**किनवट :–**दिनांक 03.07.2023 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **किनवट येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिरित्या स्वताचे फायदयासाठी अशोक लिलँड टाटा कंपणीचा छोटा हाती क्रमांक एमएच–29/टी–6013 वाहनामधुन एक बैल किंती 25,000/–रूपयाचा कत्तल करीता निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2737 प्रकाश गोविंदराव बोधमवाड, ने. पोस्टे किनवट** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट गुरन 173/2023** कलम 5,(अ), 5(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व 11, 1(ड)(ई) (आय)(एफ) प्राण्यास निर्दयतेने बांधविण्याचा प्रतिबंध अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/772 पाटोदे, मो. नं. 9657707479** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**वजिराबाद** :– दिनांक 03.07.2023 रोजी चे 20.15 वा. चे सुमारास, **सैलाबनगरच्या नाल्या जवळ ताहेर हॉस्पीटलच्या समोर नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिनल नावाचा मटका जगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 1510/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/बालाजी पंढरीनाथ कदम, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 255/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे, मो.क्रं. 9923922533** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड